# सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग

## नोकर भरतीअनुषंगाने परिक्षा केंद्रावर जाताना घ्यावयाची काळजी

हॉल तिकिट डाऊनलोड केल्यानंतर त्यावरील सर्व सुचना काळजीपुर्वक वाचून, आवश्यक मुळ कागदपत्रांसह रिपोर्टींग टायमिंगच्या १५ मिनिटे आधी परिक्षा केंद्रावर उपस्थित रहावयाचे आहे. तरी उमेदवारांनी आपला ई–मेल तपासावा व बँकेच्या वेबसाईटवरील आय.बी.पी.एस.च्या लिंकवरून कॉललेटर डाऊनलोड करून घ्यावे व खालील सुचनांचे काटेकोर पालन करावे.

## परिक्षा केंद्रावर जाताना उमेदवारांना महत्वाच्या सुचना

१. कॉललेटर सोबत खालीलपैकी कोणताही एक ओळखीचा पुरावा घेऊन जाणे.

अ. आधारकार्ड ब. पॅनकार्ड क. वाहन चालक परवाना

ड. निवडणुक ओळखपत्र इ. शासकीय ओळखपत्र उ. पासपोर्ट

वरील पुरावा सादर करताना मुळ कागदपत्रे आवश्यक आहे. अन्यथा परिक्षेला बसता येणार नाही.

२. रेशनकार्ड किंवा लर्निंग लायसन्स ओळखीचा पुरावा म्हणून स्विकारले जाणार नाही. तसेच ओळखपत्राची झेरॉक्स प्रत किंवा कलर झेरॉक्स स्विकारली जाणार नाही.

३. उमेदवाराने दिलेल्या प्रवेशपत्रावर अद्यावत फोटो चिकटविणे आवश्यक आहे. सदर फोटो ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड केलेल्या फोटोशी जुळता असणे आवश्यक आहे.

४. उमेदवारांना दिलेल्या प्रवेशपत्रात नमूद असलेल्या वेळेच्या १५ मिनिट अगोदर परिक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे.

५. प्रवेश पत्राबरोबर ओळखीच्या पुराव्याची मुळप्रत व एक झेरॉक्स प्रत प्रवेश पत्रासोबत जोडून ठेवावी.

६. परिक्षा केंद्रावर परिक्षेपुर्वी अंगठयाचा ठसा घेतला जाईल. याकरीता हाताचा अंगठा स्वच्छ व सुस्थितीत असणे आवश्यक आहे. या काळात हाताला शाई, रंग, मेहंदी इत्यादीचा वापर होऊन अंगठा खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.

७. परिक्षा केंद्रावर जाताना बॉल पॉईंट पेन व स्टँपपॅड घेऊन जाणे आवश्यक आहे.

८. पुस्तके, वहया, कॅलक्युलेटर, पेजर, मोबाईल,डिजिटल वॉच, ब्लुटुथ किंवा अन्य इलेक्ट्रॉनीक डिव्हाईस परिक्षा केंद्राच्या परिसरात किंवा परिक्षा कक्षात स्वतःजवळ ठेवणे किंवा त्याचा वापर करणे याला मनाई आहे.

९. दिव्यांग व्यक्तिंनी त्यांच्या बैठक व्यवस्थेविषयीच्या माहितीसाठी परिक्षेच्या ३० मिनिटे आधी केंद्र प्रशासकांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

१०. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल तर अशा उमेदवारांनी राजपत्रित अधिसुचना (गॅझेट)/विवाह प्रमाणपत्र/राजपत्रित शपथपत्र सादर केले पाहिजे. पॅनकार्ड हा नावात बदलाचा पुरावा म्हणून स्विकारला जाणार नाही.

११. कपडे परिधान करताना हलके कपडे ज्यात कोणतेही साधन किंवा संपर्काचे उपकरणे लपविण्यासाठी जागा असणार नाही. तसेच त्याला अर्धी बाही (Haff Sleve) असलेले कपडे वापरावे.